पत्तन कार्यालय : प्रशासन भवन, शेवा, नवी मुंबई - 400707. Port Office : Administration Bldg., Sheva Navi Mumbai - 400 707.
मुख्य सतर्कता अधिकारी Chief Vigilance Officer - (022) 2724 4151 : मुख्य प्रबंधक (प्रशासन) एवं सचिव Chief Manager (Admn.) & Secy - (022) 2724 4021 :
मुख्य प्रबंधक (यातायात) Chief Manager (Traffic) - (022) 2724 4191 : मुख्य प्रबंधक (यां.एव.वि.अ.) Chief Manager (M&EE) - (022) 2724 4181 :
मुख्य प्रबंधक (वित्त) Chief Manager (Fin) - (022) 2724 4081 : मुख्य प्रबंधक (प.यो.वि.) Chief Manager (PP&D) - (022) 2724 4156
उप-संरक्षक Dy. Conservator (022) 2724 4171 : हार्बर मास्टर (022) 2724 4173.
Website : www.jnport.gov.in • Email : info@jnport.gov.in

क्रमांक: जेएनपीए/ वाढवण/२०२४/ 1399 तारीख: २५/०१/२०२४

प्रति,

उप प्रादेशिक अधिकारी, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ (MPCB),
एमआयडीसी कॉलनी, तारापूर,
पालघर जिल्हा, महाराष्ट्र राज्य - ४०१५०४

विषय: पालघर जिल्ह्यात विनाशकारी प्रस्तावित वाढवणं बंदर उभारणीमुळे मच्छिमार, शेतकरी, आदिवासी आदी भूमिपुत्र देशोधडीला लागणार असून पर्यावरणावर आणि पर्यावरणावर अवलंबून राहणाऱ्या उपजिविकेवर मोठ्या प्रमाणात नुकसान होणार असून दिनांक १९/०१/२०२४ रोजीच्या जन सुनावणीच्या माध्यमातून सदर प्रकल्पाच्या पर्यावरणीय प्रभाव मूल्यांकन (EIA) अहलावावर हरकती नोंदवून वाढवणं बंदर उभारणी कायमचे रद्द करण्याबाबत Clarification to the Major query raised by participant reg. Public herring.

संदर्भ: अर्जदार एकनाथ अनुड्या बारी यांचा अर्ज दि १८.०१.२०२४

आदरणीय महोदय,

आपण सादर केलेल्या हरकतींचा खुलासा खालील प्रमाणे आहे.

| अ. क्र. | एकनाथ अनुड्या बारी यांचा अर्ज दि १८.०१.२०२४ | हरकतींचा खुलासा |
|---|---|---|
| १. | राज्य सरकारने २६ टक्के भागीदारी हिस्सा VPPL कंपनीमधून काढून टाकण्यात यावा: सदर प्रकल्प केंद्र सरकारचे असल्याचे बोलले जात आहे परंतु सदर प्रकल्पासाठी केंद्र आणि राज्य शासनाकडून संयुक्त उपक्रम राबवून वाढवणं पोर्ट प्रोजेक्ट लिमिटेड (VPPL U45309MH2016GO1285869) हि कंपनी स्थापन करून ७४ टक्के हिस्सा जवाहरलाल नेहरू पोर्ट प्राधिकारण आणि २६ टक्के हिस्सा महाराष्ट्र मेरीटाईम | जवाहरलाल नेहरू बंदर प्राधिकरणाने वाढवण बंदराच्या विकासासाठी महाराष्ट्र सागरी मंडळासोबत सामंजस्य करार केंद्र शासनाच्या परवानगीने १३/०२/२०२० पत्राद्वारे एसपीव्हीच्या माध्यमातून करण्यात आला आहे की ज्यामधे मे. वाढवण पोर्ट प्रोजेक्ट लिमिटेड आणि महाराष्ट्र मेरीटाईम बोर्ड यांचा अनुक्रमे ७४% आणि २६% हिस्सा आहे. सदर कंपनी ची निर्मिती केंद्र शासनाच्या परवानगीने केली आहे व यास महाराष्ट्र शासनाची मान्यता घेतली होती. या |

९/१५

| | | |
|---|---|---|
| | च्या रेड कॅटेगरी लिस्ट मधील near-threatened माश्यांच्या प्रजाती मध्ये घोळ माश्याचा समाविष्ट करण्यात आला आहे.<br><br>2) कोथ मासा :- घोळ माशाप्रमाणे कोथ माश्याचे प्रजनन केंद्र वाढवण परिसर आहे आणि हा मासा सुद्धा IUCN च्या रेड कॅटेगरी लिस्ट मधील near-threatened माश्यांच्या प्रजाती मध्ये समाविष्ट आहे. कोथ माश्याचे वैज्ञानिक नाव otolithoidus biuratus असे आहे. ह्या माश्याला सुद्धा प्राधिकरणाने आपल्या सामुद्रिक जैवविधततेच्या अहवालातून गायब करण्याचा प्रताप केला आहे.<br><br>3) पॉम्फ्रेट मासा:- महाराष्ट्र राज्याने पॉम्फ्रेट माश्याला राज्य माश्याचा दर्जा दिला असून ह्या माश्याचे संरक्षण करण्याकरिता महाराष्ट्र सरकारने पॉम्फ्रेट माश्याला संरक्षित मासा म्हणून घोषित केले आहे.<br><br>4) सामुद्रिक जैविविधतेचा अहवाल अपुरा: कुठलाही प्रकल्प राबविण्याच्या अगोदर त्या प्रस्तावित प्रकल्पच्या १० किमी क्षेत्राचा अभ्यास करणे कायद्याने बंधनकारक असताना कार्यकारी सारांशामध्ये नमूद केल्याप्रमाणे प्रकल्पसून फक्त ५ किमी सामुद्रिक क्षेत्राचा अभ्यास करण्यात आला असल्याने प्राधिकारणाकडून बनविण्यात आलेल्या सामुद्रिक जैविविधतेचा अहवाल अपुरा आहे तरी, विषयाचे गांभीर्य लक्षात घेता सदर प्रकल्पाला स्थानिकांकडून कडाडून विरोध असून दिनांक १९/०१/२०२४ | ✓ 16 तटीय मासेमारी बाधित गावांमध्ये मोटार, यांत्रिक आणि बिगर यांत्रिकी मासेमारी बोटीद्वारे मासेमारी केली जाते.<br>✓ ओळखल्या गेलेल्या 16 मासेमारी गावांमध्ये राहणाऱ्या मच्छिमारांची संख्या 5,333 घरांमध्ये सुमारे 20,809 आहे.<br>✓ या 16 गावांमध्ये मत्स्यपालन पायाभूत सुविधा अपुऱ्या असल्याचे आढळून आले.<br>✓ या परिसरात वरोर, चिंचणी, घिवली, गुंगवाडा, धाकटी-डहाणू आणि डहाणू गावात प्रत्येकी एक अशा सहा मच्छीमार सोसायट्या नोंदणीकृत आहेत.<br>✓ या प्रदेशात सामान्य सागरी मासेमारी पद्धती सेट बॅग्नेट (SBN) द्वारे 'डोल' नेट आणि 'गिलनेट' द्वारे आहेत.<br>✓ ~42 चौ. किमी. डोल नेट मासेमारी क्षेत्र आणि ~30 चौ. किमी. बंदर क्षेत्रातील गिलनेट मासेमारी.<br>✓ बंदराच्या बंदराबाहेरील क्षेत्र उदा. ~58 चौ. किमी. नियमन अधीन मासेमारीसाठी उपलब्ध असू शकते<br>✓ समुद्रात बॅगनेट मासेमारी संरचना ~822 पैकी ~265 संरचना बंदर मर्यादेत आहेत.<br>✓ सर्व निश्चित आणि ऑपरेशनल खर्चाचा विचार केल्यावर वार्षिक कमाई अनुक्रमे रु.5,00,907/- आणि रु.4,60,403/-.<br>✓ शिवाय IIT Madras व्दारे sand burrow pit dispersion चा सखोल अभ्यास केला असून त्या प्रमाणे पर्यावरण व दमनच्या कोस्टल रिजन वर कोणतीही कायमस्वरूपी परिणाम होणार नाही<br><br>अशा प्रकारे MOEF&CC च्या परवानगीने व त्यांनी सांगीतलेल्या अटी |

| | | |
|---|---|---|
| | रोजीच्या उपरोक्त विषयानुषंगे जन सुनावणीला मी हरकत नोंदवित असून प्रस्तावित वाढवण बंदर उभारणीला केंद्रीय पर्यावरण विभागाने परवानगी देऊ नये आणि ह्या बंदराला कायमचे रद्द करण्याची विनंती ह्या हरकती निवेदनाद्वारे करण्यात येत आहे, ह्याची नोंद महोदयांनी घ्यावी, हि नम्र विनंती. | शर्तीची पूर्ण पूर्तता करून बंदराच्या निर्मितीला सुरुवात केली जाईल . |

हा प्रकल्प राष्ट्रीय स्तरावर महत्वाचा असून मा. प्रधानमंत्री कार्यालयाच्या स्तरावर देखरेख ठेवली जात असल्याने या प्रकल्पाची शिफारस लवकरात लवकर पुढील मंजुरीसाठी पर्यावरण, वन आणि हवामान बदल मंत्रालयकडे करावी, अशी विनंती करण्यात येत आहे.

हे पत्र अध्यक्ष (प्रभारी) यांच्या मान्यतेने जारी केले जाते.

आपला विश्वासू,

विश्वनाथ घरत

उप महाव्यवस्थापक (पयोवी)